# धन्यवाद!

दि. ३१ मार्च २०२०

प्रिय मित्र मैत्रिणींनो,

कोरोनामुळे जनजीवन विस्कळीत झाल्याच्या पार्श्वभूमीवर, परवा आम्ही वोपा टीमने तुम्हाला रोजंदारीवर गुजराण करणाऱ्या अहमदनगर मधील गरीब लोकांना मदत करण्याचे आवाहन केले होते. लालबत्ती भागात काम करणाऱ्या महिला, त्यांची मुले, संजयनगर झोपडपट्टीत राहणारे कुष्ठरोगी, गरीब कुटुंबे, भिल्ल वस्तीतील हातमजूर लोक, हे सर्व या कठीण परिस्थितीत कसे जगात असतील हा विचार डोक्यात आला तरी सुन्न व्हायला होत होतं.

या सर्व लोकांसाठी या कठीण प्रसंगात आपण सर्वांनी मिळून खारीचा वाटा उचलला आहे. तुम्हाला सांगायला अतिशय आनंद होतो की आपण सगळ्यांनी मिळून सुमारे **एक लाख साठ हजार रुपये** जमा केलेले आहेत. सर्वांनी इतक्या कमी वेळेत दिलेला प्रतिसाद खूप सकारात्मकता घेऊन आला, तीच ऊर्जा तुमच्याशी शेअर करण्यासाठी हे पत्र!

या रकमेतून आपण ~**६० कुटुंबांना १ महिन्याचा** शिधा पोचवू शकत आहोत.

प्रत्येक कुटुंबाला गरजेनुसार एकावेळी दिला जाणारा शिधा: किंमत रु.२७५

| | | | |
|---|---|---|---|
| २ किलो तांदूळ | १ किलो साखर | ०.५ किलो डाळ | ०.२५ किलो बेसनपीठ |
| ०.५ किलो गोडतेल | २ किलो गव्हाचे पीठ | १ मसाला पाकीट | १ मीठ मिरची पाकीट |

चार ते पाच व्यक्तींच्या एका कुटुंबाला, एका महिन्यात असे साधारण १० शिधा पाकिटे लागतात.

म्हणजे एका कुटुंबाचा एक महिन्याचा खर्च: अंदाजे **२,७५०रुपये**

अहमदनगर शहरातील विविध ८ वस्त्यांमधील ४०० कुटुंबांना मदतीची गरज आहे. आदरणीय संजय गुगळे, व त्यांचे सहकारी स्वतःच्या आरोग्याची काळजी घेत, या वंचितांना स्नेहालयमार्फत अहोरात्र मदत करत आहे. त्यासाठी साधारण **११ लाख रु. प्रती महिना** मदत लागेल.

गरज मोठी आहे व कदाचित बऱ्याच काळासाठी लागणार आहेच. पण तुम्ही सर्वांनी एकत्र येऊन ही जी मदत उभी केलीत, आमच्यावर विश्वास दाखवला त्याबद्दल तुमचे आभार मानावे तेवढे कमीच!

या निमित्ताने, आपण सगळे मिळून आपल्या आजूबाजूच्या लोकांच्या हालअपेष्टा काही प्रमाणात तरी कमी करू शकतो असा विश्वास आम्हाला मिळाला. तुमच्या मदतीमुळे अजून जोमाने काम करण्याची ऊर्जा मिळाली. तुमच्या साथीने हे काम पुढे जात राहील आणि आपण अशा संकटांवर मात करत राहू.

आपले ऋणी,

प्रफुल्ल, आकाश, ऋतुजा

**वॉवेल्स ऑफ द पीपल असोशिएशन**



# धन्यवाद

तुम्ही केलेल्या प्रत्येक मदतीसाठी, त्याची किंमत आमच्यासाठी अमूल्य आहे.

# मदत देणगी देणारे मित्रमंडळी: एकूण ११२

Abhijit Marbade
Aditi Atre
Aditi Baitule
Akash Bhor
Akshay Patil
Amit Giram
Amogh Pande
Amruta Patil
Aniket Karajgikar
Anjum Pathan
Ankita Potdar
Ankush Patle
Anvita Ugalmugle
Apurvi Joshi
Arpita Kotnis
Ashok Dabhade
Astha Bijwe
Chaitali Taturkar
Chaitanya Agarkar
Chetan Bhamare
Darshani Chincholkar
Deepak Mahajan
Disha Sawant
Hemant Mahajan
Hrishikesh Kaduskar
Jagruti Deshmukh
Jagruti Palwe
Jayant Kamble
Jayant Shinde
Kalyan Tanksale
Kalyani Bondarde
Kanchan Karpe
Kaustubh Kulkarni
Ketaki Purkar
Komal Nawale
Kshitija Salvi
M Zameer
Mandeshi Varta
Manorama Parve
Mauni Nagada
Mayuri Shekhar
Milind Chaudhari
Monali Wandhare
Nayan Jadhav
Neha Dhoke
Padmaja K
Pallavi Malshe
Pankaj Sarode
Pavan Muttepawar
Pradnya Wadmare
Prafulla Shashikant
Prajakta Kodgule
Pranit Dangat
Pranjali Kawale
Prasad Naphade
Prasad Tambvekar
Prashant Amage
Pratik Gavhane
Pratik Pandey
Pravin Dongawe
Pravin Salunke
Pritam Shete
Priyanka Sonavane
Priyanka Tudme
Rajendra Vairagar
Ramesh Patwardhan
Ranjan Gajare
Ravichandra Bagul
Ritu Damahe
Rituja Sardesai
Rohan More
Ronit Wagh
Rutuja Jeve
Sachin Patil
Sagar Bendre
Sagar Bhalke
Salama Shaikh
Santosh
Sayali Joshi
Sharada Rajput
Sharayu Vyavahare
Shilpa Chavhan
Shivraj Harale
Shivraj Rathod
Shilpa Hulsurkar
Shilpa Kalapad
Shubham Ghormode
Shweta Dhembre
Shweta Hankare
Siddharth Magare
Siddhivijay Sapkal
Smita Damakale
Soham Chaudhary
Sonal Potdar
Sunita Koranne
Supriya Gutte
Surendra Budgude
Swapnil Ambure
Swapnil Kulkarni
Swapnil Kulkarni
Urmi Nivargi
Utkarsha Kamble
Vaishnavi Ganeshe
Vinod Mule
Vishal Dhage
Yamini Bobade
Yashashree Dhaye
Yashashree Dhaye
Yogesh Sathe
Anonymous
Anonymous
Anonymous

✻ सर्वांना रीतसर पावत्या लवकरच पाठवल्या जातील.







## कोरोनामुळे खूप लोकांना रोजच्या अन्नाची भ्रांत आहे, त्यांना आपल्या आर्थिक मदतीची अत्यंत आवश्यकता आहे. अधिक मदतीसाठी जरूर संपर्क करा.

G Pay **9404821839**

वोपा, ग्रामीण भागातील शिक्षकांना सक्षम करण्यासाठी कटिबद्ध आहे. आमच्या कामाविषयी, गुणवत्तेविषयी सविस्तर माहिती खालील वेबसाईटवर जरूर पहा.

# vopa.in

Prafulla - 9420650484

Rutuja - 7666818341